पुणे महानगरपालिका

**जाहिरात प्रकटन**

आरोग्य कार्यालयाअंतर्गत खालील अस्थायी पदावर ११ महिन्यांकरिता,करार पद्धतीने,एकवट मानधनावर पदे भरावयाची आहेत.

| अ क्र | हुद्दा | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुलाणी | रु.१७२०५/- | इ.४ थी उत्तीर्ण मुलाणी कामाचा कमीत कमी १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | १ वर्ष मुलाणी कामाचा अनुभव. | ११ | अज -२, विजाअ-१, भजब -१, भजक -१, इमाव -३, ईडब्ल्यूएस-३, |

अटी - **१.** वरील अनु.क्र.१मधील पदांसाठी मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा जाहिरातीचे दिनांकास ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. **२.वरील शैक्षणिक पात्रता व कमीत कमी १ वर्ष कालावधीचा मोठी व छोटी जनावरे कापण्याचा अनुभव असणे आवश्यक. ३.**सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरूपाचे आहे. ४.सर्व पदाची नेमणुक गुणाकन पद्धतीने करण्यात येतील. ५.उमेदवारांनी अर्जासोबत एक पासपोर्ट आकाराचा फोटो,आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती व अनुभवाच्या मूळ सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. ६. अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची छायांकितप्रत जोडणे आवश्यक.७.विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज,वय शैक्षणिक अर्हता गुणपत्रक,जातीचा दाखला,अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती (ट्र-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.८.निवड झालेल्या उमेदवारांना विहित नमुन्यात करारनामा करून फक्त ११ महिन्यांकरिता नेमणूक दिली जाईल.९.वरील पद हे अस्थायी स्वरूपाचे असल्याने या पदावर कायमस्वरूपीची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. १०.वरील पदासाठी नियुक्त होणाऱ्या सेवकांना महानगरपालिकेच्या कत्तलखाना व पशु वैद्यकीय विभागा अंतर्गत काम करावयाचे असून सदर कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा.खातेप्रमुख यांना राहील. ११.अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. १२.उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १३.निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळलयास,गैरवर्तन करताना आढळल्यास,दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.१४.निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एक महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

वरील सर्व पदांकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांनी दि. ०२/०३/२०२२ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेमध्ये आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित कॅ.वडके सभागृह,आरोग्य कार्यालय,तिसरा मजला,पुणे महानगरपालिका,मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे -०५.येथे सादर करावेत.वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत,याची नोंद घ्यावी.सदरची जाहिरात ही www.pmc.gov.on या संकेतस्थळावर Recruitment या सदरात उपलब्ध आहे.

उमेदवाराने सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयामार्फत वरील ठिकाणीच देण्यात येईल.

( डॉ.आशिष भारती )

**आरोग्य अधिकारी**

**पुणे महानगरपालिका**